## निशाणी १५ लगत आदेश

### ( अशोक हरिभाऊ जाधव वि. प्रफुल्लचंद्र रामकृष्णदास वैष्णव वगैरे )

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ तर्फे कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार, सदर प्रतिवादी दि. २३.०२.२०२६ रोजी हजर झाले आहेत. सदर प्रतिवादीस आवश्यक कागदपत्रे वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे लेखी कैफियत व म्हणणे मुदतीत दाखल करता आले नाही. कैफियत देण्यास ३१ दिवसांचा विलंब झाला आहे. दाव्याचा गुणअवगुणांवर निकाल होणेकामी प्रतिवादी क्र. १ यांना त्यांचे म्हणणे व कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली.

०२. वादी तर्फे अर्जावर म्हणणे दिले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज विना म्हणणे ऐकला. वादीतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०४. प्रस्तुतचा दावा निरंतर व मॅनडेटरी मनाईचा आहे. कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ यांनी हजर होऊनही म्हणणे मुदतीमध्ये दाखल केले नाही ही बाब दिसून येत आहे. तरीदेखील दाव्याचे स्वरुप पाहता, वादी, प्रतिवादी यांचे कथन पाहता दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची संधी देणे, प्रतिवादी यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे दावा गुणदोषावर निर्गत करण्यास मदत होणार आहे. अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. त्यामुळे प्रक्रियात्मक विलंब टाळण्यासाठी व दोन्ही पक्षकारांना योग्य ती संधी देण्यासाठी नैसर्गिक न्यायतत्वांचा विचार करता, सदरचा अर्ज मंजुर करणे योग्य आहे. परंतु, प्रतिवादीने केलेला विलंब लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादीने केलेल्या विलंबाचा खर्च त्याचेवर ठेवणे योग्य वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

**१.** अर्ज (नि.क्र.२६) हा प्रतिवादी क्र.१ याने वादीस विलंबाचा खर्च रक्कम रुपये २००/- (रुपये दोनशे फक्त) एवढे पुढील तारखेपर्यंत देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

**२.** प्रतिवादी क्र.१ यास कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

**(खुल्या न्यायालयात जाहीर.)**

Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2026.07.18 16:48:07 +0530

**पैठण.** **(श्रीमती एस. के. देशमुख)**

दिनांक – १८/०७/२०२६ २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

पैठण.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | S.M.Sakhare |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh,<br>2nd Jt. Civil Judge,<br>J.D.& J.M.F.C., Paithan. |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 18/07/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 18/07/2026 |